# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
## कृषि नगर, अकोला ४४४ १०४ (महाराष्ट्र)

सूचना का अधिकार

**डॉ. प्र.रा. कडू**
कुलसचिव

Phone No. : 0724-2258372
Fax No. : 0724-2258386
E-Mail – registrar@pdkv.ac.in


---

**अती महत्वाचे/ कालमर्यादा**

**मत्ता व दायित्वे यांची वार्षिक विवरणे सादर करण्याबाबत**
मुदतवाढ देणेसंबंधी...

**वाचा :** (१) शासन निर्णय क्र. वशिअ-१२१४/प्र.क्र. २६/११, दि. ०२ जून, २०१४
(२) शासन निर्णय क्र. वशिअ-१२१४/प्र.क्र. ५१ (२)/११, दि. १७ नोव्हेंबर,२०१४
(३) कृषि परिषद यांचे पत्र क्र. मकृप/आस्था-३/प्र.क्र. ९५१३/१५८०/२०१४, दि. ०२/०७/२०१४
(४) विद्यापीठ परिपत्रक क्र. बीएए/मालमत्ता विवरणे/०१/२०२०/८४, दि. २६/०२/२०२०
(५) शासन निर्णय क्र. वशिअ-११२०/प्र.क्र. २७/११, दि. ११ मे,२०२०

## परिपत्रक

क्र. बीएबी/मालमत्ता विवरणे/०१/२०२०/ १३९ दिनांक :०८/०६/२०२०

विद्यापीठ सेवेत कार्यरत असलेले सर्व अधिकारी/ कर्मचारी (गट-ड मधील कर्मचारी वगळता) यांनी उपरोक्त नमुद शासन निर्णय तसेच कृषि परिषद यांचे पत्रानुसार, दरवर्षाच्या दिनांक ३१ मार्च च्या स्थितीस अनुसरून अथवा नव्याने नियुक्त झाले असल्यास त्यांच्या प्रथम नियुक्तीच्या दिनांकास अनुसरून मत्ता व दायित्वे बाबत वार्षिक विवरणे दिनांक ३१ मे पर्यंत विहित कार्यालयास सादर करण्याबाबत आदेशित करण्यात आले होते.

तथापि, महाराष्ट्र राज्यात उद्भवलेल्या कोरोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर या विषाणूचा प्रसार रोखण्यासाठी लॉकडाउन घोषित करण्यात आला असून याकामी प्रशासकीय यंत्रणा व्यस्त आहे. तसेच कर्मचा-यांच्या कार्यालयीन उपस्थितीवर मर्यादा घालण्यात आल्या आहेत.

ही परिस्थिती विचारात घेवून, दि. ०२ जून, २०१४ च्या शासन आदेशान्वये दरवर्षाची मत्ता व दायित्वाची नियतकालिक विवरणे सादर करण्यासाठी विहित केलेली दिनांक ३१ मे पर्यंतची कालमर्यादा शासन निर्णय दिनांक ११ मे,२०२० च्या आदेशान्वये या वर्षापुरती एक विशेष बाब म्हणून शिथिल करण्यात आली असून त्यानुसार अधिकारी/ कर्मचारी यांनी त्यांचे मत्ता व दायित्वाचे विवरण **दिनांक ३१ ऑगस्ट, २०२० पर्यंत** सादर करण्यात यावे.

तसेच सेवेत प्रथम नियुक्त झालेले अधिकारी/ कर्मचारी, त्यांचा सेवेचा पहिल्या दोन महिन्यांचा कालावधी हा राज्यातील लॉकडाउन सुरू झाल्यानंतर पूर्ण होत असल्यास त्यांच्या प्रथम नियुक्तीच्या वेळेच्या स्थितीस अनुसरून मत्ता व दायित्वाचे पहिले विवरण विहित कालावधीत सादर करू शकले नाहीत वा शकत नाहीत अशी प्रकरणे असल्यास, अशा अधिकारी/ कर्मचा-यांनाही त्यांच्या प्रथम नियुक्तीच्या वेळच्या स्थितीस अनुसरून द्यावयाचे मत्ता व दायित्वाचे विवरण **दिनांक ३१ ऑगस्ट, २०२० पर्यंत** सादर करण्याची मुभा देण्यात आली आहे.

याबाबत आपल्या कार्यालयीन स्तरावर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

मा. कुलगुरू महोदय यांच्या मान्यतेने.

**स्वा/-**
कुलसचिव
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

प्रति,
..................................................
..................................................

प्रतिलिपी :

१. प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन माहिती केंद्र (ARIS Cell), डॉ. पं.दे.कृ.वि.,अकोला यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक व सहपत्रित असलेले सर्व दस्तऐवज विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.
२. कुलगुरु यांचे स्वीय सहायक,यांना मा. कुलगुरु महोदय यांचे माहितीकरिता सादर.